RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ९, अंक ३] सोमवार, जानेवारी ९, २०२३/पौष १९, शके १९४४ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जानेवारी २०२३.

**अधिसूचना**

**आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकीर्ण-२६२२/प्र.क्र.१८२/ना.पु.२९.—ज्याअर्थी, सेवा किंवा लाभ किंवा अर्थसहाय्य यांचे वितरण करण्यासाठी ओळख पटवण्याचा दस्तऐवज म्हणून, आधारचा वापर केल्यामुळे, राज्य शासनाची वितरण प्रक्रिया सुलभ होते, त्यात पारदर्शकता व कार्यक्षमता येते आणि लाभार्थ्यांना त्यांचे हक्क, सोयीस्कर व अखंड रीतीने आणि एखाद्या व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी बहुविध दस्तऐवज सादर करण्याची गरज टाळून थेटपणे मिळणे शक्य होते;

आणि ज्याअर्थी, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन (यात यापुढे याचा निर्देश "राज्य विभाग" असा केला) द्वारे कमाल आधारभूत किंमत योजनेच्या (यात यापुढे जिचा निर्देश "एमएसपी" असा केला आहे) अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र राज्याच्या एकत्रित निधीमधून केलेल्या आवर्ती खर्चाचा अंतर्भाव आहे;

त्याअर्थी, आता, आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ, सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, २०१६ ("कायदा") (२०१६ चा १८) (यात यापुढे ज्याचा निर्देश,"उक्त अधिनियम" असा केला आहे.) कलम ४ च्या उप-कलम (४) च्या खंड (बी) च्या उपखंड (ii) व आधार प्रमाणीकरण (सामाजिक कल्याण, नवीनता, माहिती) नियम, २०२० च्या नियम ५ नुसार महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील-प्रमाणे अधिसूचित करीत आहेः—

१. (१) एमएसपी अंतर्गत धान/भरडधान्य राज्य शासनाला विकू इच्छिणारी शेतकरी असलेली आणि विकलेल्या धानानुसार/भरडधान्यानुसार रोख हस्तांतरण प्राप्त करण्यासाठी पात्र असलेल्या व्यक्तीने, आधार क्रमांक धारण केल्याचा पुरावा सादर करणे किंवा आधार क्रमांकाचे अधिप्रमाणन करून घेणे आवश्यक असेल. एमएसपी अंतर्गत धान/भरडधान्य विकण्यासाठी जी स्वतःची नोंदणी करू इच्छित असेल, अशी, तो स्वतः किंवा ती स्वतः अशा कोणत्याही नवीन शेतकरी असलेल्या व्यक्तीने-देखील आधार क्रमांक धारण केल्याचा पुरावा सादर करणे किंवा आधार क्रमांकाचे अधिप्रमाणन करून घेणे आवश्यक असेल.

(२) एमएसपी अंतर्गत राज्य शासनाला धान/भरडधान्य विकण्यासाठी आणि राज्य शासनाकडून रोख हस्तांतरण प्राप्त करण्यासाठी नोंदणी करू इच्छित आहेत अशा सर्व इच्छुक शेतकरी व्यक्ती, जी व्यक्ती आधार क्रमांक धारण करीत नाही किंवा जिने अद्याप आधारसाठी नाव नोंदणी केलेली नाही अशा या योजनेखालील लाभ मिळवण्यासाठी इच्छुक असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, आधार नाव नोंदणीकरिता दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत अर्ज करणे आवश्यक असेल, परंतु ती व्यक्ती उक्त अधिनियमाच्या कलम ३ नुसार आधार क्रमांक प्राप्त करण्यासाठी हक्कदार असली पाहिजे आणि अशी व्यक्ती आधार नोंदणी करून घेण्यासाठी कोणत्याही आधार नाव नोंदणी केंद्रास (भारतीय अनन्यसाधारण ओळख प्राधिकरण (UIDAI) संकेतस्थळ (www.uidai.gov.in येथे सूची उपलब्ध आहे) येथे भेट देऊ शकेल.

(३) आधार (नाव नोंदणी व अद्यावत करणे) विनियम, २०१६ याच्या व नियम १२ नुसार विभागाने त्याच्या अंमलबजावणी अभिकरणामार्फत, ज्यांनी अद्याप आधारसाठी नाव नोंदणी केलेली नाही, अशा लाभार्थ्यांकरिता आधार नाव नोंदणी सुविधा देणे आवश्यक आहे. जर संबंधित गटात किंवा तालुक्यात किंवा तहसीलात कोणतेही आधार नाव नोंदणी केंद्र स्थित नसेल, तर विभाग त्याच्या अंमलबजावणी अभिकरणामार्फत UIDAI च्या विद्यमान प्रबंधकाच्या समन्वयाने किंवा ते स्वतः UIDAI चे प्रबंधक होऊन सोयीच्या ठिकाणी आधार नाव नोंदणी सुविधा पुरविलः

परंतु, लाभार्थ्यास आधार क्रमांक नेमून देईपर्यंत, एमएसपी अंतर्गत राज्य शासनाला धान/भरडधान्य विकण्यासाठी राज्य शासनाकडून रोख हस्तांतरण प्राप्त करण्यासाठी पुढील दस्तऐवज सादर करण्यास अधीन राहून, त्यांना अशा सेवा किंवा अर्थसहाय्य किंवा लाभ देण्यात येतीलः—

(क) राज्य शासनाने निर्गमित केलेले शिधावाटप पत्रिका; आणि

(ख) (एक) त्याने किंवा तिने आधार नाव नोंदणी केली असेल तर, त्याची किंवा तिची आधार नोंदणी केल्याची ओळख चिठ्ठी; किंवा

(दोन) परिच्छेद २ च्या उप परिच्छेद (२) मध्ये बिनविष्ट केल्याप्रमाणे आधार नोंदणी करण्यासाठी त्याने/तिने विनंती केल्याची प्रत; आणि

(ग) (एक) भारताच्या निवडणूक आयोगाने दिलेले मतदार छायाचित्र ओळखपत्र; किंवा

(दोन) आयकर विभागाने दिलेली स्थायी खाते क्रमांक पत्रिका (पॅन कार्ड); किंवा

(तीन) पारपत्र (पासपोर्ट); किंवा

(चार) मोटार वाहन अधिनियम, १९८८(१९८८ चा ५९) अन्वये लायसन देणाऱ्या प्राधिकरणाने दिलेले वाहन चालन लायसन; किंवा

(पाच) राजपत्रित अधिकाऱ्यांनी किंवा तहसीलदाराने कार्यालयीन नाममुद्रीत पत्रावर दिलेले अशा व्यक्तीचे छायाचित्र असलेले ओळख प्रमाणपत्र; किंवा

(सहा) पोस्ट विभागाने दिलेले नाव व छायाचित्रासह पत्ता असलेली पत्रिका; किंवा

(सात) किसान पत्रिका पासबुक; किंवा

(आठ) राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेला कोणतेही अन्य दस्तऐवजः

परंतु आणखी असे की, वरील कागदपत्रे या प्रयोजनासाठी राज्य शासनाने पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याकडून तपासण्यात येतील.

**२.** धान/भरडधान्य इत्यादीच्या प्रापणाशी संबंधित सेवा सुलभतेने व त्वरेने पुरवण्यासाठी राज्य शासन, पुढील बाबींचा समावेश असलेली आवश्यक ती सर्व व्यवस्था करीलः—

(१) या योजने अंतर्गत लाभार्थ्यांना आधार कार्डच्या आवश्यकतेची त्यांना जाणीव करून देण्यासाठी धान/भरडधान्य यांच्या प्रापणाशी संबंधित प्रसिद्धी व व्यक्तिगत सूचना जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यामार्फत देण्यात येईल. ज्यांनी या आधीच नाव नोंदणी केली नसेल त्याबाबतीत, उपलब्ध असलेल्या जवळच्या नाव नोंदणी केंद्रांमध्ये जाऊन **दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यंत** त्यांनी स्वतःची नाव नोंदणी करून घ्यावी असा त्यांना सल्ला देण्यात येईल. स्थानिकरीत्या उपलब्ध असलेल्या नाव नोंदणी केंद्राची सूची त्यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

(२) धानाच्या/भरडधान्याच्या प्रापणाशी संबंधित व्यक्तींच्या बाबतीत, नाव नोंदणी केंद्र नसल्यामुळे संबंधित गटात किंवा तालुक्यात किंवा जिल्ह्यात किंवा राज्यात नाव नोंदणी नसल्यामुळे, नाव नोंदणी करणे शक्य नसेल तर मात्र, राज्य शासन, त्याच्या अंमलबजावणी अभिकरणामार्फत UIDAI च्या विद्यमान प्रबंधकाच्या समन्वयाने किंवा ते स्वतः UIDAI चे प्रबंधक होऊन सोयीच्या ठिकाणी आधार नाव नोंदणी सुविधा पुरवील आणि धान/भरडधान्ये यांच्या प्रापणाशी संबंधित व्यक्तींना त्यांचे नाव, पत्ता, भ्रमणध्वनी क्रमांक, शिधापत्रिका क्रमांक परिच्छेद १ च्या उप-परिछेद (३) च्या परंतुकात विनिर्दिष्ट केलेला त्यांच्या प्रापण केंद्रासह अन्य तपशील देऊन किंवा त्या प्रयोजनासाठी तरतूद केलेल्या वेब पोर्टलवर नाव नोंदणीची विनंती करता येईल.

**३.** ही अधिसूचना महाराष्ट्र राज्याच्या **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तिच्या दिनांकापासून अंमलात येईल.

**४.** राज्य शासन, वैयक्तिक शेतकऱ्यांद्वारे आधार क्रमांक धारण केल्याचा पुरावा प्राप्त झाल्यापासून तीस दिवस इतक्या कालावधीच्या आत, अशा व्यक्तींना प्रापण नोंदणी ओळखपत्र क्रमांकाला आधार क्रमांक जोडील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय वाघमारे,**
शासनाचे सचिव.

## FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 9th January, 2023.

*NOTIFICATION*

AADHAAR (TARGETED DELIVERY OF FINANCIAL AND OTHER SUBSIDIES, BENEFITS AND SERVICES) ACT, 2016.

No. Sankirn-2622/C.R. 182/CS-29.—Whereas the use of Aadhaar as an identity document for the delivery of services or benefits or subsidies simplifies the Government delivery processes, brings transparency and efficiency, and enables beneficiaries to get their entitlements directly in a convenient and seamless manner and Aadhaar obviates the need for producing multiple documents to prove one's identity.

And whereas, implementation of Minimum Support Price Scheme (hereinafter referred to as MSP) by Food, Civil Supplies and Consumer Protection Department, Government of Maharashtra (hereinafter referred to as 'State Department') involves recurring expenditure from the Consolidated Fund of Maharashtra.

Now, therefore, in pursuance of the provisions of sub-clause (ii) of clause (b) of sub-section (*4*) of section 4 of the Aadhaar (Targeted Delivery of Financial and Other Subsidies, Benefits and Services) Act, 2016 ("Act") (18 of 2016) (hereinafter referred to as the 'said Act'), read with Rule 5 of the Aadhaar Authentication for Good Governance (Social Welfare, Innovation, Knowledge) Rules, 2020; the State Government hereby notifies the following, namely :—

**1.** (1) An individual farmer willing to sell paddy/coarse grains to State Government under MSP and eligible to receive a cash transfer against the sold paddy/foodgrains is hereby required to furnish proof of possession of an Aadhaar number or undergo Aadhaar authentication. Any new individual farmer who is willing to register himself or herself for selling paddy / foodgrains under MSP is also required to furnish proof of possession of Aadhaar number or undergo Aadhaar authentication as stated in ensuing clauses.

(2) All such interested individual farmers who are willing to register, sell paddy / coarse grains to and receive cash transfer from the State Government under MSP, who do not possess the Aadhaar Number or, are not yet enrolled for Aadhaar are hereby required to make an application for Aadhaar enrolment by 31st March, 2023, provided he or she is entitled to obtain Aadhaar as per Section 3 of the said Act. All such individuals may visit any Aadhaar enrolment centre (list available at *www.uidai.gov.in*) to get enrolled for Aadhaar.

(3) As per regulation 12 of Aadhaar (Enrolment and Update) Regulations, 2016, the State Department which requires an individual to furnish Aadhaar is required to offer enrolment facilities for the beneficiaries who are not yet enrolled for Aadhaar and in case there is no Aadhaar enrolment centre located in the respective Block or Taluka or Tehsil, the State Department is required to provide enrolment facilities at convenient locations in coordination with the UIDAI or the existing Registrars of UIDAI or by becoming UIDAI registrar themselves:

Provided that, till the Aadhaar is assigned to the individuals who wish to register, sell paddy / coarse grains to and receive cash transfer from the State Government under MSP, service or subsidy or benefits shall be given to a such individual, subject to the production of the following identification documents, namely :—

(*a*) Ration Card issued by the State Government; and

(*b*) (*i*) If he or she has enrolled, his or her Aadhaar Enrolment ID slip; or

(*ii*) a copy of his or her request made for Aadhaar enrolment, as specified in sub-paragraph (2) of Paragraph 2; and

(*c*) (*i*) Voter ID card issued by the Election Commission of India; or (*ii*) Permanent Account Number Card issued by Income Tax Department; or (*iii*) Passport; or (*iv*) Driving License issued

by Licensing authority under Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988); or (*v*) Certificate of Identity having photo issued by the Gazetted officer or Tehsildar on an official letterhead; or (*vi*) Address card having Name and Photo issued by Department of Posts; or (*vii*) Kisan Photo Passbook; or (*viii*) any other document as specified by the State Government :

Provided further that the above documents shall be checked by an officer designated by the State Government for that purpose.

**2.** To provide convenient and hassle-free services related to procurement of paddy/ coarse grains etc. the State Department shall make all the required arrangements including the following, namely :—

(1) Publicity and individual notices through the District Supply Office shall be given to individuals related to procurement of paddy/ coarse grains to make them aware of the requirement of Aadhaar under the scheme and they may be advised to get themselves enrolled at the nearest enrolment centres available in their areas by 31st March, 2023 in case they are not already enrolled. The list of locally available enrolment centres shall be made available to them.

(2) In case, individuals related to the procurement of paddy/coarse grains are not able to enroll due to the non-availability of enrolment centres in near vicinities such as in the Block or the Tehsil or the District or the State; State Government is required to provide enrolment facilities at convenient locations in coordination with the UIDAI or the existing Registrars of UIDAI or by becoming UIDAI registrar themselves and the individuals related to the procurement of paddy/coarse grains may register their request for enrolment by giving their name, address, mobile number, ration card number and other details specified in the proviso to sub-paragraph (3) of paragraph 1 with their procurement centre or through the web portal provided for the purpose.

**3.** This notification shall come into effect from the date of its publication in the *Official Gazette* in Maharashtra State..

**4.** The State Government shall, within a period of thirty days from the receipt of proof of possession of the Aadhaar number furnished by individual farmers, link the Aadhaar number with procurement registration identification number issued to such individual.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY WAGHMARE,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.